# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि./३००/०६/२०१२
मुंबई - ४०० ०३२,
४ जून २०१२,

## परिपत्रक :-

प्रति,

१) विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक व विभागप्रमुख.

२) प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये तसेच सर्व संलग्नित विज्ञान संस्था.

विषय : - विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०११-२०१२) प्रदान करणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येत आहे की, श्रीमती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या कालखंडात समाजामध्ये स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोऊन केलेल्या संस्मरणीय कार्याबद्दल व त्यांच्या स्मृतीपित्यर्थ मुंबई विद्यापीठातर्फे सन २००३-२००४ सालापासून विद्यापीठाच्या कार्यकक्षेत येणा-या विद्यापीठ विभागातील/महाविद्यालयातील शिक्षिका (१ शहरी व १ ग्रामीण) अशा एकूण २ आदर्श शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्रदान करून गौरव करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. त्या अनुषंगाने सन २०११-२०१२ सालाकरिता सदर पुरस्कारासाठी पात्र शिक्षिकांची निवड करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक निवड समिती गठीत करण्यात येणार आहे. विद्यापीठातर्फे निवड होणा-या पुरस्कारप्राप्त शिक्षिकांना प्रत्येकी रूपये १०,०००/- रोख व त्यासोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणास असे कळविण्यात येते आहे की, विद्यापीठाचे विविध विभाग/महाविद्यालयीन स्तरावर **किमान दहा वर्षे स्थायी सेवा झालेल्या व विशेष गुणवत्ता, अर्हता प्राप्त केलेल्या आणि अनुभव असलेल्या पात्र शिक्षिकांचे प्रस्ताव विद्यापीठाने गठीत केलेल्या निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येणार आहेत.** स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थामध्ये क्रियाशिल सहभाग व उल्लेखनीय कामगिरी, व्यक्तिगत स्तरावर केलेल्या कार्याबाबतचे विश्वासार्ह अहवाल, स्त्रियांच्या प्रश्नावर केलेले अभ्यासपूर्ण संशोधन व उल्लेखनीय लेखन, आर्थिक स्तरावर स्त्रियांना सक्षम करण्यासाठी केलेले प्रयत्न, स्वयंरोजगार, प्रशिक्षण, अंगणवाडी, हुंडा निर्मुलन, स्त्री-पुरूष समानता, स्त्री शोषण, जातियता निर्मुलन, सर्वधर्म समभाव इत्यादी उपक्रमांशी क्रियाशिल सहभाग इत्यादी गोष्टी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील.

समितीपुढे विचारार्थ ठेवण्यासाठी आपल्या संस्थेतील/विभागातील/महाविद्यालयातील जास्तीत जास्त दोन पात्र शिक्षिकांचे स्वयंपुर्ण प्रस्ताव त्यांच्या स्वाक्षरीनिशी सोबत जोडलेल्या 'अ', 'ब' आणि 'क' या विवरण पत्रासोबत माहिती भरून आपल्या शिफारशीसह सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, रूम नं. १३२, पहिला मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. **यांच्याकडे दिनांक २० जुलै २०१२ पर्यत पाठविण्यात यावेत.** त्या नंतर अर्ज स्विकारणार नाही तसेच अपु-या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद असावी.

आपणांस असेही कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराच्या प्रस्तावाबत सुचक व अनुमोदक अशा दोन विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील स्थायी सेवेत असलेल्या शिक्षक कर्मचा-यांच्या स्वाक्ष-या असणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे अर्जदाराने प्रपत्रातील विहित रकान्यात आपल्या स्वत:च्या प्रस्तावास संमती असल्याचे जाहीर करणे आवश्यक राहील.

तरी आपण हे परिपत्रक, अर्ज इत्यादी विद्यापीठ संकेत स्थळावरून घ्यावे आणि सर्व संबधित शिक्षिकांच्या निदर्शनास आणावे.

आपला विश्वासू,

सही/-

प्राचार्य. डॉ. राजपाल एस. हांडे

(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)

**विशेष सुचना : १) अर्जदारांने प्रस्तावासोबत विद्यापीठ मान्यता प्रत जोडणे आवश्यक आहे.**

**२) विद्यापीठ संकेत स्थळावरील (www.mu.ac.in) अर्जाची प्रत व वितरण पत्र भरून सादर करावेत.**

...३/-

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

क्र.वि.नि.वि.वि./३००/०६ (अ)/२०१२ ४ जून, २०१२

विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,

विद्यापीठ ग्रथालयाचे ग्रथपाल, व वित्त व लेखा अधिकारी,

क्र.वि.नि.वि.वि./३००/०६(ब)/२०१२ ४ जून, २०१२

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अग्रेषित :-**

१. प्राध्यापक, गुरूदेव टागोर तौलानिक साहित्य अध्यासन,

२. समन्वयक, लोककला अकादमी, विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई,

३. समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, रत्नागिरी,

४. समन्वयक, डॉ. आबेडकर सामाजिक न्याय केंद्र,

५. अध्यक्षा, महिला विकास कक्ष,

६. सर्व उपकुलसचिव व/ सहाय्यक कुलसचिव,

७. कुलगुरूचे कार्यकारी चिटणीस,

८. स्वीय सहायक (१) कुलगुरू (२) कुलसचिव,

(३) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:-**

१. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ आणि महाविद्यालय शिक्षण संघटना,

अभिलेखा विभाग १० प्रती,

सही/-

प्राचार्य. डॉ. राजपाल एस. हांडे
(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)

## प्रपत्र 'अ'

श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०११-२०१२)

१) शिक्षिकेचे संपूर्ण नाव :

२) पत्ता व दूरध्वनी क्रमांक (निवास) :

३) सेवेत असलेल्या महाविद्यालयाचे/
विद्यापीठ विभागाचे नाव व पत्ता :

४) धारण केलेले पद (स्थायी) :

५) अध्यापनाचा अनुभव :

६) शैक्षणिक अर्हता :

७) प्रस्ताव सुचविणा-या शिक्षकाचे सपूर्ण
नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक :

८) सूचकाचे महाविद्यालय/विद्यापीठ
नाव व पत्ता व मोहर :
प्रस्ताव सुचविणा-या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी

९) प्रस्तावास अनुमोदन देणा-या शिक्षकाचे
नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक :

१०) अनुमोदकाचे महाविद्यालय/विद्यापीठ
विभागाचे नाव, पत्ता व मोहर :
प्रस्ताव सुचविणा-या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी

मी खाली सही करणार श्रीमती/कुमारी ---------------------------
असे जाहीर करते की उपरोक्त माहिती सत्य असून सदर प्रस्तावास माझी संमती आहे.

दिनांक :

शिक्षिकेची स्वाक्षरी

श्रीमती/कुमारी ................................हया आमच्या विभागात ................................
या पदावर कार्यरत असून मी प्रमाणित करतो/करते की त्यांनी वर दिलेली माहिती सत्य असून सदर प्रस्तावासाठी त्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व संस्थेची मोहर

# प्रपत्र - ‘ब’

श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार” (२०११-२०१२)

| क्र. | शिक्षकेचे नाव व पदनाम | सध्या सेवेत असलेले ठिकाण | स्थायी सेवेचा कालावधी (प्रमाणपत्रांसहित) | विषय | शैक्षणिक पात्रता | ग्रंथ/लेखन इ. (स्त्रियांच्या प्रश्नावरील संशोधन) प्रती सादर कराव्यात | सहक्षैणिक उपक्रमामधील सहभाग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेले उल्लेखनीय कार्य (अंगणवाडी) जातियता निर्मुलन साक्षरता अभियान इ. बाबत सहभाग | सामाजिक उपक्रमामधील सहभाग (स्त्री शोषणा विरूध्द जाणीव आणि जागृती, स्त्रीयांवरील अत्याचार, हुंडा निर्मुलन इ. बाबत क्रियाशिल सहभाग) | मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेली पारितोषिके/ बक्षिसे | थोडक्यात परिचय (स्वतंत्र) परिशिष्ट जोडावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

दिनांक :

ठिकाण : विद्यापीठाच्या विभागाचे संचालक/विभागप्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व संस्थेची मोहर

# प्रपत्र ‘क’

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

श्रीमती/कुमारी ..........................................................................

(आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाम - प्राध्यापक/ अधिव्याख्याता/प्रपाठक ........................................

. यांचा गतइतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.

त्यांच्या विरूध्द विभागीय अथवा अन्य प्रकारची कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू नाही.

ठिकाण :-

दिनांक :- स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व संस्थेची मोहर